**नियमित दिवाणी दावा क्रमांक १००८/२०१५**
(सीएनआर क्र.एमएचएएच०८-००१४९९-२०१५)

## नि.क्र.२१ वरील आदेश

वादींनी सदरचा अर्ज दावा दुरूस्तीस परवानगी मिळणेकरीता दाखल केला आहे.

०२. वादींचे अर्जातील कथन थोडक्यात असे :- त्यांनी सदरचा दावा, वाटप, जाहीर ठराव व निरंतर मनाई आदेश मिळण्यासाठी दाखल केला आहे. सदर दावा प्रलंबित असतांना प्रतिवादी क्र. ८ श्रीरंग तुकाराम पवार हे दि.१२.०१.२०१९ रोजी तसेच वादी क्र.४ सिताबाई बजाबा पवार ही दि. १६.०१.२०१८ रोजी मयत झालेले आहेत. वादी क्र.४ हिला वादी क्र.१ ते ३ व वादी क्र.५ ते ८ हेच वारस आहेत. त्यामुळे वादी क्र.४ व प्रतिवादी क्र.८ यांच्या नावासमोर मयत हा शब्द लिहुन तशी दुरूस्ती करण्यास परवानगी मिळावी अशी विनंती वादींनी केली आहे.

०३. वादींचे सदर अर्जास प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी त्याच अर्जावर म्हणणे दाखल करून सक्त हरकत नोंदवली आहे. प्रतिवादी त्यांच्या म्हणण्यामध्ये असे कथन करतात की, वादी क्र.४ ही दि.१६.०१.२०१८ रोजी मयत झाली आहे, ती दुरुस्ती ९० दिवसांच्या आत करणे गरजेचे आहे. वादींनी सदर अर्ज दाखल करण्यास तब्बल ३ वर्षे ८ महिन्यांचा विलंब केलेला आहे परंतु विलंबाबाबतचे कारण अर्जात नमुद केलेले नाही. प्रतिवादी क्र.८ हा दि.१२.०१.२०१९ रोजी मयत झाला आहे. त्याचे वारस अभिलेखावर आणण्यासाठी तब्बल २ वर्षे ८ महिने इतका उशिर झाला आहे. सदर मयतांच्या विरूद्ध दावा उपशम झाला आहे, तसेच प्रस्तुत अर्ज दाखल करण्यास देखील विलंब झाला आहे. सबब, सदरचा अर्ज नामंजुर करावा अशी विनंती प्रतिवादी यांनी केली आहे.

०४. अर्ज व म्हणणे वाचले व दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादींनी सदरचा दावा वाटप, जाहीर ठराव व निरंतर मनाई आदेश मिळण्यासाठी दाखल केला आहे. वादींच्या म्हणण्याप्रमाणे सदर दावा प्रलंबित असतांना प्रतिवादी क्र.८ श्रीरंग तुकाराम पवार हे दि.१२.०१.२०१९ रोजी तसेच वादी क्र.४ सिताबाई बजाबा पवार ही दि.१६.०१.२०१८ रोजी मयत झालेले आहेत. वादी क्र.४ हिला वादी क्र.१ ते ३ व वादी क्र.५ ते ८ हेच वारस आहेत. प्रतिवादींच्या म्हणण्याप्रमाणे वादींनी सदरचा अर्ज विलंबाने दाखल केला आहे त्यामुळे प्रस्तुतचा दावा वादी क्र.४ व प्रतिवादी क्र.८ यांच्याविरूद्ध उपशम झाला आहे.

०५. वादी क्र.४ चे कायदेशिर वारस वादी क्र.१ ते ३ व ५ ते ८ अभिलेखावर अगोदरपासुन आहेत त्यामुळे तिच्याविरूद्ध दावा उपशम होवु शकत नाही. प्रतिवादी क्र.८ चे वारस वादींनी अभिलेखावर घेतलेले नाही. याउलट प्रतिवादी क्र.८ चे नावासमोर मयत हा शब्द लिहुन तशी दुरूस्ती करण्याची परवानगी मागितली आहे. वादींनी मागितलेली दुरूस्ती ही तांत्रिक स्वरूपाची असुन त्यामुळे दाव्याच्या स्वरूपामध्ये कोणताही बदल होणार नाही, तसेच प्रतिवादींचे अधिकारावर देखील गदा येणार नाही. वादींनी प्रस्तुतचा अर्ज दाखल करणेस विलंब केला आहे, त्यामुळे सदरचा अर्ज त्यांचेवर खर्च लादुन मंजुर करणे योग्य होईल. सबब, सदरचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. त्याबाबतचा सविस्तर आदेश मी खालील प्रमाणे पारीत करीत आहे.

## <u>आ दे श</u>

१. सदरचा अर्ज रक्कम रूपये २,०००/- खर्च लादून मंजुर करण्यात येतो. सदरचा खर्च प्रतिवादी क्र.१ ते ४ यांना देण्यात यावा.

२. वादींनी सदरची दुरूस्ती सदरचा आदेश पारीत झाल्यापासुन १४ दिवसांच्या आत करावी.

Sangita Pundlik Babar
Digitally signed by Sangita Pundlik Babar
Date: 2022.09.28 13:31:00 +0530

ठिकाण :- संगमनेर.
दिनांक :- २८.०९.२०२२.

(श्रीमती. एस. पी. बाबर)
३ रे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर
संगमनेर.